# ग्रामीण महिलांचे आर्थिक सबलीकरण

**प्रा.डॉ. वागडव ए.आर., समाजशास्त्र विभागप्रमुख विवेकानंद महाविदयालय, औरंगाबाद.**

**श्रीमती काळवणे के.आय., न्यु हायस्कूल व उच्च माध्यमिक विदयालय, करमाड, ता.जि. औरंगाबाद.**

**ई-मेल आयडी : tankalwane@gmail.com**

भारत हा खेडयांचा देश म्हणून ओळखला जातो. आजही ६५८ जनतेच्या उदरनिर्वाहाचे साधन शेती आहे. त्याकरिता ग्रामीण भागातील विकास केल्याशिवाय देशाचा विकास होणार नाही. म्हणूनच स्वातंत्र्य प्राप्तीनंतर कल्याणकारी राज्याची संकल्पना स्विकारली गेली. ग्रामसंस्कृती हा देशाचा पाया म्हणून ओळखला जातो. महात्मा गांधींच्या खेडयाकडे चला या संकल्पनेनुसार खेडयाची म्हणजेच ग्रामीण भागाची सुधारणा झाल्याशिवाय भारतात सुधारणा होणार नाही. भारताचे माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी जे भारत महासत्ता होण्याचे स्वप्न पाहिले आहे. ते पूर्ण करण्यासाठी ग्रामीण भाग स्वयंपूर्ण होणे आवश्यक आहे.

समाजामध्ये स्त्री आणि पुरुष ही एकाच रथाची दोन चाक आहेत आणि ती दोन्हीही सारखीच असायला हवी. तरच समाजाचा रथ व्यवस्थित चालु शकेल. देशातील प्रत्येक राज्यातील महिलांची सद्य:स्थिती शिक्षण, आरोग्य आणि रोजगार या तीन प्रमुख निकषांवर तपासली जाते. कोणत्याही समाजाचा विकास त्या समाजातील महिलांच्या स्थितीवरुन ठरवला जातो. २०११ च्या जनगणनेनुसार देशाची लोकसंख्या १२१.०६ कोटी आहे. त्यातील ४८.५ टक्के महिला आहे. म्हणजेच जवळपास निम्मी लोकसंख्या महिलांची आहे. त्यामुळे समाजाच्या एकात्मिक विकासासाठी आणि राष्ट्र उभारणीसाठी महिलांचेही समप्रमाणात योगदान अनिवार्य आहे. मात्र देशात दिर्घकाळापासून महिला सामाजिक, आर्थिक, शौक्षणिक आणि राजकीय अडथळ्यांचा सामना करत आहेत. त्यातही महिलांच्या शिक्षण-रोजगाराकडे सबलीकरणाचे प्रमुख साधन म्हणून बघितले जात नाही.

स्त्रियांना समान दर्जा न देण्याची पारंपारिक पुरुषी मानसिकता समाजात दिसून येते. त्याचाच परिणाम स्त्रियांना सहन करावा लागतो. प्रादेशिक दुर्गमता, दळणवळण सुविधांचा अभाव, आरोग्याच्या समस्या, सामाजिक अस्वस्थता याचा परिणाम महिलांच्या जीवनावर झाला आहे. महिला या देशाच्या भविष्याची शक्ती आहे आणि त्यामुळे ही शक्ती सुदृढ व सबल करणे ही समाजाची जबाबदारी आहे. कामकाजी, व्यवसायी, नोकरदार या सर्व क्षेत्रातील महिलांना त्यांच्या क्षमताची जाणीव करुन देऊन वौयक्तिक स्वातंत्र्य व निर्णय घेण्याचा अधिकार मिळणे गरजेचे आहे. आपल्या भारत देशाला पूर्ण विकसित बनविण्यासाठी व परिपूर्ण विकासाचे लक्ष पूर्ण करण्यासाठी महिला सबलीकरण महत्वाचे आहे.

महिला सबलीकरण म्हणजे काय ?

महिला सबलीकरण ही एक मानसिक अवस्था असून त्यामध्ये महिलांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी सामाजिक, आर्थिक, शौक्षणिक, राजकीय यासारख्या क्षेत्रामध्ये महिलांच्या विकासाला पूरक वातावरण निर्माण करण्यावर भर दिला.

कायदे कल्याण कार्यक्रमाच्या माध्यमातून आर्थिक, सामाजिक, शौक्षणिक व राजकीय सर्व क्षेत्रामध्ये महिलांना पुरुषांच्या बरोबरीने हक्क व दर्जा प्रदान करुन देणे, विकासासाठी संधी उपलब्ध करुन देणे आणि स्त्री-पुरुष असमानता नष्ट करणे या प्रक्रियेला महिला सबलीकरण असे म्हणतात.

समाजाचे संतुलन साधने यासाठी पुरोगामी आणि विवेकी समाजाने बाळगलेला दृष्टिकोन केलेली कृती यांचा समुच्चय म्हणजे महिला सबलीकरण होय. महिला सबलीकरणामुळे स्त्रियांचे क्षेत्र फक्त चूल आणि मूल यापुरते मर्यादित न राहता ते आरोग्य, बँका, प्रशासन, राजकारण, अर्थकारण, समाजकारण यासारख्या सर्व क्षेत्रांशी जोडले गेले आहे.

महिला आर्थिक सबलीकरणाची गरज :

साक्षरतेचे प्रमाण उंचावत आहे ही एक महिलांच्या बाबतीत समाधानकारक बाब वगळली तर अन्य बहुतेक मुद्दयांबाबत सुधारणेसाठी खूपच वाव असल्याचे जाणवते. स्त्रियांना समाजातील हक्काचे स्थान आणि माणूस म्हणून स्थान मिळत नाही हे विदारक वास्तव आहे. भारतातील बहुसंख्य महिला या घरकामात गुंतलेल्या असतात. कमी उत्पादकतेची व कमी कौशल्याची कामे महिलांकडे दिली जातात. याला कारणीभूत असणारे एक मुख्य कारण म्हणजे ग्रामीण भागातील महिला या निरक्षर, अडाणी आणि कमी शिक्षित असल्याचे दिसून येते. त्यामुळे त्यांच्यामध्ये पुरेशी जाणीवजागृती नसते. म्हणून महिला या उपजिविकेसाठी शेती, मजूरी, उदयोग, दुग्ध व्यवसाय इत्यादी कामे करतात. परंतु या कामाची कधीच मोजमाप केली जात नाही. म्हणून महिलांचे आर्थिक उत्पन्नाचे प्रमाण कमी व वेगही कमी असतो. याच कारणामुळे महिलांच्या आर्थिक सबलीकरणाला चालना देणे गरजेचे आहे.

मानवी हक्कांविषयी अनेक आंतरराष्ट्रीय करारात मान्यता मिळूनही महिला निर्धन आणि निरक्षर राहण्याचे प्रमाण मोठे आहे. वैदयकीय सुविधा, मालमत्तेची मालकी, पतपुरवठा, प्रशिक्षण आणि रोजगारात पुरुषांच्या तुलनेत महिलांना कमी संधी मिळते. महिला या पुरुषांच्या तुलनेत राजकीयदृष्टया सक्रीय असणे फारच कमी आहे. महिला या घरगुती हिंसाचार, अत्याचार, हुंडाबळी, बलात्कार यासारख्या घटनांच्या बळी होण्याचे प्रमाणही मोठे आहे. यासाठी महिलांची मानसिकता बदलणे हे अतिशय महत्वाचे आहे. ग्रामीण भागात महिला आजही स्वत: निर्णय घेऊ शकत नाहीत. त्या पुरुषांच्या निर्णयावर अवलंबून राहतात. घटनेने अनेक अधिकार तसेच महिलांची आर्थिक स्थिती सुधारावी यासाठी अनेक प्रकारच्या योजना व उपक्रम आहेत, याची माहिती त्यांच्यापर्यंत पोहचली पाहिजे, प्रबोधन झाले पाहिजे. म्हणूनच महिला या सबल होण्याची गरज निर्माण होत आहे.

महिला आर्थिक सबलीकरणाची उद्दिष्टये :

१. महिलांना शौक्षणिक, आर्थिक, वौचारिकदृष्टया सबल करणे.

२. समान संधी, समृध्दता आणि विविध शासन धोरणांमध्ये स्वत:हून सहभाग घेण्यासाठी महिलांना प्रोत्साहन देणे.

३. महिलांना आर्थिकदृष्टया स्वावलंबी बनवणे.

४. महिलांची समाजातील मानसिकता बदलणे व त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करणे.

महिलांसाठी आर्थिकदृष्टया विविध उपक्रम व योजना :

शासनाने महिलांसाठी विकासासाठी आणि त्यांच्या सबलीकरणासाठी विविध कार्यक्रम व योजनांची अंमलबजावणी केली आहे. अगदी ग्रामस्तरापासून ते शहरी पातळीपर्यंत महिलांच्या विकाससंबंधी योजना राबविल्या जातात. ही खरोखरच आनंददायी व अभिनंदनीय बाब आहे.

१. महिला व बाल कल्याण समितीमार्फत राबविण्यात येणा-या योजना :-

(i) शाळेत जाणा-या मुलींना सायकली पुरविणे, लांब पल्ल्याच्या (२ कि.मी. अंतरावरील) शाळेत जाणा-या मुलींसाठी (इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंत शिकणा-या) सायकली पुरविणे. या योजने अंतर्गत मुलींना सायकली पुरविल्यामुळे त्यांना शाळेत येण्या-जाण्यासाठी सुविधा प्राप्त होते.

(ii) ग्रामीण भागातील आर्थिकदृष्टया कमकुवत असलेल्या स्त्रियांसाठी मोफत शिलाई मशिन खरेदी करणे – केंद्र पुरस्कृत एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रमाखाली दारिद्रय रेषेखालील महिलांना शिलाई मशीन देण्याची तरतूद आहे. तसेच समाजकल्याण विभागामार्फत देखील शिलाई मशीन पुरविण्याची तरतूद आहे.

(iii) ग्रामीण महिला व बालकल्याण रोग निदान शिबिराचे आयोजन – ० ते ६ वयोगटातील बालकांच्या आरोग्याची तपासणी तज्ञ डॉक्टरांकडून करुन घेणे व आवश्यक असलेले औषधोपचार करणे, यासाठी रोगनिदान शिबिरे आयोजित करण्याची ही नविन योजना आहे.

(ड) किशोरवयीन मुलींना जीवनकौशल्याचे प्रशिक्षण देणे - याबाबत अनुभवी व संवेदनशील तज्ञ / स्वयंसेवी संस्थामार्फत सदर प्रशिक्षण आयोजित करण्यात यावे. त्याचे स्वरुप स्थानिक आवश्यकतेनूसार ठरविण्यात यावे. उदा.शालेय / महाविदयालयात शिकणा-या मुलींसाठी किंवा गळती झालेल्या मुलींसाठी दर आठवडयाला वर्ग भरविण्यात यावेत. बाहेरील तज्ञ व डॉक्टरांना मनोवैज्ञानिकांना सदर सत्र घेण्यासाठी निमंत्रित करण्यात यावे.

(ढ) मुलींना व महिलांना व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षण देणे.

(ध) मुलींना स्वसंरक्षणासाठी व त्यांच्या शारीरिक विकासासाठी प्रशिक्षण योजना.

(धत) महिलांना कायदेशीर / विधिविषयक सल्ला देणे, महिलांसाठी हेल्पलाईन सुरु करणे.

२. महिला उदयोजकासाठी कर्ज योजना (२००१-०२) :

सार्वजनिक बँकाव्दारे महिला उदयोजकांना लागणा-या एकूण निधीपैकी काही निधी कमी व्याजावरील कर्जाच्या स्वरुपात उपलब्ध करुन देणे. त्याव्दारे महिलांच्या स्वयंरोजगाराला चालना देणे.

३. सुवर्ण जयंती ग्राम स्वयंरोजगार योजना :

शहरी भागातील महिलांसाठी सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना राबविली जाते. तर ग्रामीण भागातील आर्थिकदृष्टया दुर्बल असलेल्या महिलांना स्वयंरोजगाराव्दारे आर्थिक मदत भागविण्यासाठी बचतगटाच्या माध्यमातून अर्थसहाय्य करणारी महिला स्वावलंबन योजना राबविते.

४. बचतगट योजना :

नियमितपणे केलेल्या अल्पबचतीतून आर्थिक सहाय्य करण्यासाठी भांडवल उभे करण्यासाठी संघटनशक्ती वाढविण्यासाठी परस्परांच्या सहकार्याने सभासदाच्या नेतृत्वाने तयार झालेली संकल्पना म्हणजे ‘बचत गट’ होय. बचतगटामुळे गावातच रोजगाराच्या संधी उपलब्ध झालेल्या आहेत. बचतगटाच्या माध्यमातून महिलांना आर्थिक स्वावलंबनाच्या वाटेवरुन जाण्यास सहाय्य झाले. लोणचे, पापड, इतर घरगुती खाद्य पदार्थ बनविणे, कागदी पिशव्या बनवणे, ज्वेलरी मेकींग, दुग्ध व्यवसाय, मसाले निर्मिती, गुळाची चिक्की, बेकरी उत्पादन निर्मिती यासारख्या अनेक उपक्रमातून, व्यवसायातून महिला अर्थाजन करत आहेत. महिला सबलीकरणात बचतगटाचा मोठा वाटा आहे. बचतगटामुळे ग्रामीण महिला अभ्यासु तसेच बोलक्या होऊन दु:खातून सावरण्याची शक्ती त्यांना प्राप्त होत आहे.

५. ब्युटिशियन व फॅशन डिझायनिंग व्यवयाय :

ग्रामीण भागामध्ये विकास कार्यक्रमांतर्गत ब्युटिशियन व फॅशन डिझाईनिंग या व्यवसायाचे प्रशिक्षण घेण्याची संधी प्राप्त करुन दिली जाते. प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर या शिक्षणाचा उपयोग व्हावा म्हणून महिला स्वत:चे ब्युटीपार्लर सुरु करु शकतात. यासाठी देखील अनुदानाची तरतूद असून व्यवसाय प्राप्तीची संधी मिळत आहे.

६. माझी कन्या भाग्यश्री या प्रधानमंत्री योजने अंतर्गत मुलगी व तिची आई यांचे संयुक्त बचत खाते सुरु करण्यात येते. मुलगी ५ वर्षाची झाल्यानंतर प्राथमिक शाळा प्रवेश, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा प्रवेश या कालावधीत प्रतिवर्षी २ हजार रुपये व ३ हजार रुपये लाभ होतो. वयाची १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर १ लाख रुपये मुलींना प्राप्त होऊन त्यातील १० टक्के रक्कम मुलींच्या कौशल्य विकासावर खर्च केले जातात.

अशाप्रकारे ग्रामीण स्तरावर देखील महिलांच्या सबलीकरणासाठी विविध कल्याण कार्यक्रम आणि योजनांना गतिमान करण्यात आलेले आहे.

आपल्या अनेकानेक पिढयांनी कर्तव्याचे सगळे ओझे जेंव्हा फक्त एकाच खांदयावर दिले तर तो दुखावणार, तो अधू होणार आणि अजूनही आपण जागे झालो नाही तर मग एकांगी

एकलकोंडा समाज निर्माण होऊन सामाजिक स्वास्थ्य निश्चितच बिघडेल. त्यासाठी मुक्ताबाई मुक्त व्हावी, सावित्रीबाई लिहिती वाचती व्हावी, जिजाऊ लढती व्हावी, रमाई उभी रहावी, समाज निरोगी व्हावा असं वाटत असेल तर शिक्षणाची आणि त्याचबरोबर अत्यंत महत्वाचे म्हणजे घ्महिला सबलीकरणाचीङ आवश्यकता आहे.

संदर्भ :


१. ग्रामीण समाजशास्त्र - आलोक कुमार - इशिका पब्लिशिंग हाऊस, जयपूर (भारत) - ३०२०१८.

२. भारत के ग्रामीण क्षेत्रों में महिला एवं बालविकास - डॉ.रत्न प्रकाश - अकादमिक एक्सेलेन्स, ४२ एकता अपार्टमेंट, गीता कालोनी, दिल्ली - ११० ०३१.

३. वर्तमानपत्र.

४. लोकराज्य मासिक.

५. सामान्य अध्ययन.

६. योजना.

७. विकीपेडिया.